**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक ३० जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **शहीद दिनानिमित्त राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना देशाचं अभिवादन.**
2. **दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताचा तपास सीआयडीकडे.**
3. **राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाची उद्या बैठक ; विधिमंडळ नेते पदी सुनेत्रा पवार यांची निवड व्हावी, अशी अनेकांची भावना असल्याची मंत्री छगन भुजबळ यांची माहिती.**
4. **अकोला महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपच्या शारदा खेडकर, उपमहापौरपदी भाजपाचे अमोल गोगे यांची निवड.**

**आता सविस्तर बातम्या …….**

**गांधी अभिवादन**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या ७८ व्या पुण्यतिथीनिमित्त आणि शहीद दिनानिमित्त देश त्यांना आदरांजली अर्पण करत आहे. यानिमित्त देशभरात विविध ठिकाणी अभिवादनाचे कार्यक्रम होत आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी नवी दिल्लीत राजघाट इथं महात्माजींच्या समाधीस्थळी जाऊन आदरांजली अर्पण केली. यावेळी सर्वधर्म प्रार्थनासभेचं आयोजनही करण्यात आलं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना आदरांजली अर्पण केली. आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेचा मुख्य आधार असलेल्या स्वदेशीच्या विचारावर गांधीजींनी नेहमीच भर दिल्याचं पंतप्रधानांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. गांधीजींचं व्यक्तिमत्त्व आणि त्यांचं कार्य देशवासीयांना सदैव कर्तव्याच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देत राहील, असंही ते म्हणाले. भाषा, धर्म, जात या आधारावर विभागलेल्या भारताला बापूजींनी एका सूत्रात बांधलं, असं केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी राजघाटावर जाऊन महात्मा गांधी यांना आदरांजली वाहिली. राज्यसभेतील विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे यांनीही महात्मा गांधींना आदरांजली वाहिली आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही राष्ट्रपित्याला अभिवादन केलं. मुंबईत विधानभवन इथल्या गांधीजींच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. विदर्भातही सर्व शासकीय कार्यालयात शहीद दिनानिमित्त मौन पाळण्यात आलं. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त नागपूर शहर काँग्रेस कमेटीच्या वतीनं नागपूर इथल्या व्हेरायटी चौकातील महात्मा गांधी यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आलं. यावेळी नागपूर शहर काँग्रेस कमेटीचे शहराध्यक्ष आमदार विकास ठाकरे यांच्यासह काँग्रेसचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

**सीआयडी**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताचा तपास महाराष्ट्र गुन्हे अन्वेषण विभाग अर्थात सीआयडीकडे सोपवण्यात आला आहे. विभागानं या माहितीला दुजोरा दिला आहे. गेल्या बुधवारी बारामती विमानतळावर उतरत असताना विमानाचा अपघात होऊन अजित पवार यांच्यासह ५ जणांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी पुणे ग्रामीण पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली होती. आता हा तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात आला आहे. या अपघाताची चौकशी वेगानं करण्यासाठी सहकार्य करावं, असं आवाहन केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केलं आहे. विमान अपघात

अन्वेषण ब्यूरोतर्फे सुरू असलेल्या चौकशीत अपघातस्थळी आवश्यक सहकार्य करावं, असं त्यांनी फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे.

**राष्ट्रवादी पक्ष विलीनीकरण**

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'वर्षा' निवासस्थानी भेट घेतली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर उपमुख्यमंत्रीपद तसंच त्यांच्याकडे असलेली खाती कुणाकडे सोपवली जाणार, याबाबत सुरू असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्वाची मानली जात आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाची उद्या बैठक बोलावण्यात आली आहे. अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे पक्षाच्या विधिमंडळ नेत्याचे पद रिक्त झाले आहे. या पदावर अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची निवड होण्याची शक्यता आहे. पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी उद्या विधिमंडळ बैठक बोलावण्यात आल्याचं आज मुंबईत माध्यमांशी बोलताना सांगितलं.

***आज आमच्यासमोर प्रश्न काय आहे,की सीएलपी लीडर म्हणजे विधानमंडळातील आमच्या पक्षाचा प्रमुख त्याची नेमणूक करणे म्हणजे उपमुख्यमंत्री पदाची नेमणूक करणे. आज सगळ्यात महत्त्वाची गोष्ट काय आहे, जी ताबडतोब आम्हाला करायला पाहिजे. सरकारी पक्षात उपमुख्यमंत्री पदावर बसायचं आहे. लोक चालवायचं आहे, सरकार चालवायचं आहे, त्याच्यामध्ये भाग घ्यायचा आहे. पक्ष जे आहेत, पक्षाचा नेता म्हणून आपला निवडून तो अगोदर सगळ्यात त्याला प्रायोरिटी देण्यात येत आहे.***

विधिमंडळ नेते पदी सुनेत्रा पवार यांची निवड व्हावी, अशी अनेकांची भावना असून ही मागणी रास्त असल्याचंही भुजबळ यांनी सांगितलं. तसंच, उद्या विधिमंडळ पक्ष नेता निवडीचा निर्णय झाल्यास तातडीनं शपथविधी होण्याची शक्यताही भुजबळ यांनी वर्तविली. अजित पवारांकडे राज्याच्या उपमुख्यमंत्री पदासोबत अर्थ आणि नियोजन, उत्पादन शुल्क आणि क्रीडा खात्याचा कार्यभार होता. दरम्यान, पवार कुटुंब दुःखात असताना उपमुख्यमंत्रिपदाच्या नावाची चर्चा करणं अयोग्य आहे, असं भाजपाचे माध्यम प्रमुख नवनाथ बन यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत पत्रकारांशी बोलत होते. दुःखात असलेल्या कुटुंबावर राजकीय दबाव नको, असं सांगत राजकारण थांबत नाही, हे खरं असलं तरी काळ आणि वेळेचं भान असायलाच हवं, असं बन म्हणाले.

**सामंजस्य करार**

महाराष्ट्रातील ग्रामीण विकासाला नवी दिशा देणाऱ्या एका महत्वपूर्ण उपक्रमाला आज भारतीय व्यवस्थापन संस्था नागपूर इथून सुरुवात करण्यात आली. आय. आय. एम. नागपूर, टाटा मोटर्स फाउंडेशन आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त सहकार्यानं इंटिग्रेटेड व्हिलेज डेव्हलपमेंट प्रोग्राम - IVDP 2 राबवण्यात येणार आहे. या उपक्रमाअंतर्गत राज्यातील गावांचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास साधण्याचा प्रयत्न केला जाणार असून या उपक्रमाचा उद्देश गावांना आत्मनिर्भर बनवण्याचा आहे. या संदर्भातील सामंजस्य करारावर आय. आय. एम. नागपूरचे संचालक डॉ. भिमराया मेत्री आणि टाटा मोटर्स फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनोद कुलकर्णी यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या उपक्रमात टाटा मोटर्स फाउंडेशन आर्थिक सहकार्य करणार असून, राज्य सरकार प्रशासकीय पाठबळ देणार आहे. भारतीय व्यवस्थापन संस्थान नागपूर या प्रकल्पासाठी ‘नॉलेज पार्टनर’ म्हणून काम करणार आहे. तसेच राज्याची प्रशिक्षण संस्था ‘यशदा’ यांच्या सहकार्याने क्षेत्रीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार असून, सरकारी योजना थेट गरजूंपर्यंत पोहोचवण्यावर भर देण्यात येणार आहे.

**मनपा महापौर / सत्तास्थापना**

अकोला महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपाच्या शारदा खेडकर तर, उपमहापौरपदी भाजपाचे अमोल गोगे यांची निवड झाली आहे. शहर विकास आघाडीच्या शारदा खेडकर यांना ४५ मतं मिळाली, तर महाविकास आघाडीच्या सुरेखा काळे यांना ३२ मतं मिळाली. काँग्रेस आघाडीत गेलेले भाजपाचे बंडखोर अपक्ष नगरसेवक

आशिष पवित्रकार यांनी भाजपाला पाठिंबा दिला. एम आय एम चे तीन नगरसेवक तटस्थ राहिले. दरम्यान महापौरपदी निवड झालेल्या शारदा खेडकर यांनी अकोल्याला स्मार्ट सिटी बनविण्याचा मानस प्रसारमाध्यमांसोबत बोलतांना व्यक्त केला.

***रोज शुद्ध नळाला पाणी, रस्ते, वॉकिंग ट्रॅक आणखी बगीचे आणि महिला सुरक्षेकडे प्राधान्याने लक्ष. नक्कीच अकोला शहराचा विकास होणार. अकोला स्मार्ट सिटी ही नक्की होणार.***

अमरावती महापालिकेच्या २०२६ च्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षानं १५ नगरसेवक निवडून आणलं असून या सर्व नगरसेवकांच्या एकमतानं आणि पूर्ण सहमतीनं काँग्रेस पक्षाच्या गटनेता पदावर विलास इंगोले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विलास इंगोले हे अमरावती महानगरपालिकेचे माजी महापौर असून, प्रभाग क्रमांक १४ (जवाहरगेट-बुधवारा) इथून सलग सातव्यांदा नगरसेवक म्हणून ते निवडून आले आहेत.

**विजय वड्डेटीवार**

समृद्धी महामार्गावर काँग्रेसच्या नगरसेवकाची बस थांबवून त्यांना धमकावण्यात आलं, हल्ला करण्याचा प्रयत्न झाला. यावेळी हल्लेखोरांजवळ चाकू, तलवार, बंदूक असल्याची माहिती मिळाली असून पोलीस या प्रकरणी तपास करत असल्याची माहिती काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आज नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांना दिली. दरम्यान, येत्या अधिवेशनात विरोधी पक्ष नेते पदाबाबत सरकार नवीन विधेयक आणणार आहे. या विधेयकाला वडेट्टीवार यांनी विरोध करत याची काय गरज आहे, असा सवाल उपस्थित केला. राज्यात उपमुख्यमंत्री पद आहे, जे घटनेनुसार नाही; पण विरोधी पक्ष नेते पद द्यायचे नाही म्हणून सरकार पळवाटा शोधत आहे. सरकारला हवा तसा कारभार करायचा आहे. विरोध नको म्हणून हे विधेयक आणले जात आहे. ही सरकारची दुटप्पी भूमिका असल्याची टीकाही वडेट्टीवार यांनी केली.

**सुधारित निवडणूक तारीख**

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी राज्यातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर या 12 जिल्हा परिषद आणि या जिल्ह्यातील 125 पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी येत्या ५ फेब्रुवारीऐवजी आता ७ फेब्रुवारीला मतदान; तर मतमोजणी ७ फेब्रुवारीऐवजी ९ फेब्रुवारीला होईल. जाहीर प्रचाराची समाप्ती ५ फेब्रुवारीला रात्री १० वाजता होईल. सर्वोच्च न्यायालयानं या निवडणुकांसाठी 31 जानेवारी 2026 च्या पुढे फक्त दोन आठवड्यांची मुदतवाढ दिली आहे; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं 28 जानेवारी रोजी अपघाती निधन झाल्यामुळे राज्य शासनानं राज्यात 28 जानेवारी 2026 ते 30 जानेवारी 2026 पर्यंत दुखवटा जाहीर केला आहे. या कालावधीचा विचार करून जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या कार्यक्रमातील उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची सूचना उद्या 31 जानेवारी रोजी प्रसिद्ध करतील.

**वीजचोरी कार्यवाही**

महावितरणच्या नागपूर परिमंडलानं वीजचोरी करणाऱ्यांविरुद्ध आपली मोहीम अधिक तीव्र केली असून, एप्रिल ते डिसेंबर 2025 या 9 महिन्याच्या कालावधीत महावितरणच्या स्थानिक तांत्रिक विभागानं केलेल्या धडक कारवाईत एकूण 1 हजार 963 ठिकाणी थेट वीजचो-या उघडकीस आणल्या आहेत. याशिवाय ज्या कारणासाठी वीज घेतली, त्याव्यतिरिक्त इतर कारणासाठी अनधिकृत वापर करणाऱ्या 167 ग्राहकांवरही कार्यवाही करीत एकूण 2 हजार 130 ग्राहकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. कारवाई करण्यात आलेल्या ग्राहकांपैकी 974 जणांनी थेट मुख्य वीज वाहिनीवर 'आकडा' टाकून चोरी केली होती. मात्र, उर्वरित 989 ग्राहकांनी तांत्रिक छेडछाडीचा मार्ग अवलंबला होता. याशिवाय, ज्या कारणासाठी वीज घेतली, त्याव्यतिरिक्त इतर कारणासाठी

अनधिकृत वापर करणाऱ्या 167 ग्राहकांवरही कारवाई करून 39 लक्ष 30 हजार देयकं आकारण्यात आली आहेत.

**हवामान**

नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्यानं संपूर्ण विदर्भामध्ये हवामान राहण्याचा कोरडे राहण्याचा अंदाज वर्तविला असून आज सर्वात कमी तापमानाची नोंद नागपूर इथं 14 पूर्णांक 2 अंश सेल्सिअस करण्यात आली असून भंडारा इथं कमाल तापमान 32 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं.

******